# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

## परिपत्रक क्र.१६७

विषय :ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या जास्त दराच्या निविदांच्या बाबतीतील कार्यपध्दतीबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र. दि.ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२२/पापु-०७ दि.१६.२.२०१५

**पार्श्वभूमी :**

ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजूरीच्या शासन निर्णयात जास्त दराच्या निविदा स्वीकृत करण्यापूर्वी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची परवानगी घेण्याविषयी व शासनाची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नये, अशा अटींचा समावेश असतो.

निविदा समितीमार्फत निविदा स्वीकृती झाल्यानंतर जास्त दराच्या निविदेस मान्यता देण्याविषयीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतो. मात्र, असे निदर्शनास आले आहे की, अशा प्रस्तावांना शासनाची मंजूरी प्राप्त होण्यापूर्वीच काही योजनांच्या बाबतीत कार्यादेश देऊन कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

संदर्भीय शासन निर्णयान्वये, अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक रकमेच्या निविदा प्राप्त झाल्यास अशा निविदा स्वीकृतीसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील, अशा सूचना प्राप्त आहेत.

ही बाब विचारात घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश :**

यापुढे ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांच्या बाबतीत निविदा किंमतीपेक्षा जास्त दराचा देकार प्राप्त झाल्यास, याबाबत प्रथम शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास अवगत करुन शासनाची मान्यता प्राप्त करुन घेणे क्रमप्राप्त राहील. शासनाची मान्यता प्राप्त

झाल्यानंतरच निविदा स्वीकृत करण्याविषयी किंवा निविदा, मजीप्राच्या निविदा समितीसमोर सादर करण्याविषयीची कार्यवाही करण्यात येईल. त्यानुसार, यापुढे निविदा प्रस्तावांचे सादरीकरण करण्यात यावे.

वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. सदर आदेशाचे पालन न केल्याचे आढळल्यास, संबंधीतांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
मुंबई-२१
रवाना
सही

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-२/३५०/९८२
दि.१० सप्टेंबर, २०१५

**प्रत माहितीसाठी सादर :**

- मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, मंत्रालय, मुंबई-४००००१.
- विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्राल, मुंबई-३२.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परिक्षण पथक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
  ***सदर परिपत्रक मजीप्राच्या संकेत स्थळावर अपलोड करावे.***
  अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग (सर्व)